# प्रसिध्दी पत्रक

दि.२१/१२/२०२०

महाराष्ट्र शासनाच्या पत्र क्रमांक आरटीई - २०१३/प्र.क्र.९१/प्राशि-१, दिनांक २३ ऑगस्ट, २०१३ अन्वये परिषदेच्या वतीने "महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०१९" दि.१९/०१/२०२० रोजी आयोजन करण्यात आले होते. सदर परीक्षेत पात्रता प्राप्त उमेदवारांची पात्रता प्रमाणपत्र त्या त्या जिल्हयाचे शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद/शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प) यांचे कार्यालयाकडे संबंधित शिक्षण उपसंचालक कार्यालयामार्फत वितरण करण्यात आलेली आहे.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प) यांनी जाहीर केलेल्या ठिकाणी पात्रता प्रमाण पत्राचे वाटप केले जाणार आहे. पात्रता धारक उमेदवारांनी परीक्षा परिषदेच्या www.mahatet.in या वेबसाईट वरील सूचना वाचून आवश्यक त्या मूळ कागदपत्रांसह ज्या जिल्हयात परीक्षा दिली तेथील जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प) यांचे कार्यालयाशी संपर्क साधून आपले प्रमाणपत्रे प्राप्त करुन घ्यावे.

आयुक्त
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद
पुणे-१.